## निशाणी क्रमांक १९ वरील आदेश

सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ (यापुढे संक्षिप्तपणे 'सदर कायदा' असे संबोधण्यात येईल) चे कलम २३ अंतर्गत अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

## अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –

२. अर्जदार क्र १ ही गैरअर्जदार क्रमांक १ याची पत्नी असुन त्यांचा विवाह दिनांक ०५/०६/२०१० रोजी कुडाशी येथे झाला. सदर विवाह संबंधातुन त्यांना अर्जदार क्रं. २ पुजा आणि अर्जदार क्रमांक ३ जान्हवी अशा दोन मुली आहेत. अर्जदार लग्न झाल्यानंतर गैरअर्जदाराकडे कुडाशी येथे एकत्रीत कुटुंबात नांदायला गेली. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्रमांक १ याच्या नोकरीच्या ठिकाणी वापी येथे नांदण्यास गेली. परंतु गैरअर्जदार हा त्याच्या आईवडीलांच्या सांगण्यावरुन अर्जदार हिचा शारीरीक व मानसिक छळ करीत होता. लग्नामध्ये योग्य मानपान झाला नाही असे म्हणुन त्रास देत होता. गैरअर्जदार हा दारु पिऊन दारुच्या नशेमध्ये अर्जदार हिला नेहमीच शिवीगाळ करुन शारीरीक व मानसिक त्रास देत होता. गैरअर्जदार हा अर्जदार हिच्या चारीत्र्यावर संशय घेत होता. ईतर गैरअर्जदार सुध्दा अर्जदाराचा शारीरीक व मानसिक छळ करीत होते. तसेच ॲपे रिक्षा घेण्यासाठी माहेरुन तिला एक लाख रुपये आणण्यासाठी सांगत होते. जुन, २०१६ मध्ये अर्जदार ही माहेरुन पैसे आणत नसल्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदार आणि तिच्या मुलींना तिच्या माहेरी सोडुन दिले. गैरअर्जदार हे अर्जदाराच्या माहेरी येऊन तिला फारकत देण्याबाबत नेहमीच दमदाटी करुन तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार करीत असतात.

३. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार क्रमांक २ व ३ च्या पालनपोषणाची आणि शिक्षणाची जबाबदारी तिच्यावर आहे. गैरअर्जदार क्रमांक १ हा वापी येथे नामांकित कंपनीत नोकरीत आहे. त्याला रुपये ३५,०००/– दरमहा पगार मिळतो. तसेच ओव्हरटाईम केल्याबाबत रुपये १०,०००/– ते १५,०००/– एवढी रक्कम मिळते. गैरअर्जदाराकडे एकत्र कुटूंबाची शेतजमिन असुन त्यापासुन त्याला रुपये ५ ते ६ लाखाचे वार्षिक उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदाराचे स्वतःच्या मालकीचे कुडाशी येथे घर आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करुन अर्जदार हिने स्वताःसाठी ५,०००/– प्रतिमाह आणि अर्जदार क्रमांक २ व ३ साठी प्रत्येकी रुपये ५,०००/– प्रतिमाह अंतरिम खावटीची मागणी केली आहे.

४. गैरअर्जदार क्रमांक १ याने सदर अर्जाला निशाणी क्रमांक १२ प्रमााणे खुलासा दाखल केला आहे. सदर खुलासा हा गैरअर्जदार क्रमांक २ ते ६ तर्फे निशाणी क्रमांक १४ वर पुरसीस दाखल करुन स्वीकृत करण्यात आला. गैरअर्जदार यांनी त्यांच्याविरुध्दचे सर्व आरोप नाकारले. तसेच त्यांनी अर्जदार हिच्यावर कोणताही कौटुंबिक हिंसाचार केला नसल्याचे कथन केले आहे. पैशाची बेकायदेशीर मागणी केली आणि अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ केला ही बाब त्यांनी नाकारली आहे. अर्जदार हिचे पुर्वी दिलीप नावाच्या मुलाशी लग्न झाले होते. परंतु सदरील बाब अर्जदाराने लपवुन ठेवली. अर्जदार ही दिलीप सोबत चांगली नांदली नाही म्हणुन त्याने तिला सोडुन दिले. तसेच लग्न झाल्यानंतर सुध्दा अर्जदार ही परपुरुषासोबत तासनसान गप्पा मारीत असते. ती गैरअर्जदार क्रमांक १ सोबत नेहमीच भांडण करीत असते. तसेच गैरअर्जदारांना खोटया केसेस करण्याची धमकी देत असते. अर्जदार ही स्वतःहुन गैरअर्जदाराचा त्याग करुन गेलेली आहे. गैरअर्जदार हा मजुरीचे काम करुन स्वतःचा उदरनिर्वाह करतो. त्याच्यावर त्याच्या वृध्द आई वडीलांची जबाबदारी आहे. त्यामुळे तो अर्जदारांना स्वतंत्र खावटी देऊ शकत नाही. याउलट अर्जदार ही बचत गटाची सदस्य असुन त्याआधारे ती स्वतंत्र व्यवसाय करते. अर्जदार क्रमांक २ व ३ चा उदरनिर्वाह करण्यास ती सक्षम आहे. या सर्व कारणांमुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर होण्यास गैरअर्जदाराने विनंती केली आहे.

५. अर्जदारातर्फे अधिवक्ता श्री.के.एच.सावळे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जदारांच्या अर्जानुसार युक्तीवाद केलेला आहे. गैरअर्जदाराने अर्जदार हिला शारीरीक आणि मानसिक त्रास देऊन तिला घराबाहेर हाकलुन दिलेले आहे. अर्जदार हिला संसार सुखापासुन वंचित केले आहे. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिच्यावर तिच्या मुलींच्या शिक्षणाची आणि पालनपोषणची जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. याउलट, गैरअर्जदाराचे अधिवक्ता श्री. पी.डी.बागुल यांनी असा युक्तीवाद केला आहे की, गैरअर्जदाराने अर्जदार हिला कोणताही प्रकारचा शारीरीक आणि मानसिक त्रास दिला नाही. अर्जदार ही स्वतःहुन गैरअर्जदाराचा त्याग करुन गेलेली आहे. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे. गैरअर्जदार हा केवळ मजुरीचे काम करतो. त्याच्यावर त्याच्या आईवडीलांची जबाबदारी आहे. तो अर्जदारांना स्वतंत्र खावटी देऊ शकत नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

६. सदर कायदयाचे कलम २३ अंतर्गत अंतरीम आदेशाचा अर्ज निकाली करतेवेळी दोन्ही पक्षांच्या कथनाचे सखोल व विस्तृतपणे विवेचन करणे आवश्यक नाही. गैरअर्जदाराने अर्जदार हिला शारीरीक आणि मानसिक त्रास देऊन तिला कोणतेही कारण नसतांना सोडुन दिले

आणि तिच्या पालनपोषणची कोणतीही व्यवस्था केली नाही हे प्रथमदर्शनी पाहणे गरजेचे असते. अर्जदाराचा अर्ज आणि शपथपत्र वाचले असता, असे प्रथमदर्शनी दिसुन येते की, गैरअर्जदाराने तिचा शारीरीक आणि मानसिक छळ केल्याने ती मुलींसह माहेरी राहत आहे. गैरअर्जदाराने कोणतेही सबळ कारण नसतांना अर्जदार हिला संसारसुखापासुन वंचित केले आहे. तसेच गैरअर्जदाराने तिच्या मुलींच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे अर्जदाराने शपथपत्राद्वारे कथन केले आहे. कोणतीही स्त्री संयुक्तीक कारण असल्याशिवाय वैवाहीक जिवनाचा त्याग करुन विभक्त राहणार नाही. गैरअर्जदाराने अर्जदार आणि त्याच्या मुलींच्या पालनपोषणाची व्यवस्था केली आहे असे त्याचे म्हणणे नाही. पत्नी आणि मुलींच्या पालनपोषणाची व्यवस्था करण्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी गैरअर्जदाराची आहे.

७. गैरअर्जदार याच्या कथनानुसार, अर्जदार ही बचत गटाची सदस्य असुन त्याआधारे स्वतंत्र व्यवसाय करते. परंतु अर्जदाराचे उत्पन्न दाखविण्यासाठी गैरअर्जदारातर्फे कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर दाखल करण्यात आले नाही. अर्जदाराचे असे कथन आहे की, गैरअर्जदार हा वापी येथे नामांकित कंपनीत नोकरीत आहे. त्याला रुपये ३५,०००/– दरमहा पगार मिळतो. तसेच ओव्हरटाईम केल्याबाबत रुपये १०,०००/– ते १५,०००/– एवढी रक्कम मिळते. गैरअर्जदाराकडे एकत्र कुटूंबाची शेतजमिन असुन त्यापासुन त्याला रुपये ५ ते ६ लाखाचे वार्षिक उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदाराचे स्वतःच्या मालकीचे कुडाशी येथे घर आहे. परंतु अर्जदारातर्फे सुध्दा गैरअर्जदाराचे उत्पन्न दाखविण्यासाठी कोणतेही दस्तऐवज दाखल करण्यात आले नाही. परंतु गैरअर्जदार हा मजुरीचे काम करतो असे त्याने त्याच्या खुलाशात सांगीतले आहे. पत्नी आणि मुलींच्या पालनपोषणाची जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. गैरअर्जदार क्रमांक १ याचे उत्पन्न, जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती तसेच अर्जदारांच्या गरजा लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्रमांक १ याने अर्जदार क्रमांक १ हिला दरमहा अंतरीम पोटगी रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) तसेच अर्जदार क्रमांक २ आणि ३ यांना दरमहा अंतरीम पोटगी रक्कम प्रत्येकी रुपये १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार मात्र) अर्जाच्या दाखल तारेखपासुन

म्हणजेच दिनांक २०/०७/२०२२ पासुन दयावे असे आदेशित करण्यात येते.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार हिस विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by Yogeshwari Krushnarao Raut
Date: 2023.05.08 17:22:10 +0530

ठिकाण – नंदुरबार (श्रीमती वाय.के.राऊत )

दिनांक – ०८/०५/२०२३ न्यायदंडाधिकारी,प्रथम वर्ग,नंदुरबार